“लातूर जिल्हयातील रेणापूर व जळकोट तहसीलमधील ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत भूगोल विषयातील पीएच. डी. (विद्यावाचस्पती) या पदवीकरिता सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

रामेश्वर राजकुमार स्वामी

एम.ए., बी.एड. सेट

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बळवंत तेजेराव पाटील

भूगोल विभागप्रमुख

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,

मुखेड ता.मुखेड जि.नांदेड

: भूगोल संशोधन केंद्र :

महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर

ता.अहमदपूर जि.लातूर (महाराष्ट्र)

ऑगस्ट 2023

"लातूर जिल्ह्यातील रेणापूर व जळकोट तहसीलमधील ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास"

1.1 प्रस्तावना

वस्ती भूगोल ही मानवी भूगोलाची एक महत्त्वाची शाखा आहे. यामध्ये वस्त्यांचा सर्वांगीण अभ्यास केला जातो. शेती, मासेमारी, लाकूडतोड या प्राथमिक व्यवसायामुळे वस्त्यांचे स्वरूप ग्रामीण होते. कालांतराने वस्त्यांचा झपाट्याने विकास होऊन त्यांची कार्ये बदलत गेली. वस्त्यांच्या विकासाचा वेग व पातळी सर्वच बाबतीत सारखी नसते. त्यामुळे वस्त्यांचा आकार सारखा दिसून येत नाही. वस्त्यांचा आकार हा क्षेत्र व वस्तीची लोकसंख्या यावरून ठरत असतो. जर वस्तीमधील अंतर वाढते तर वस्त्यांची घनता कमी होते व वस्तीचा आकार वाढत असतो.

मानवी वस्ती ही मानवाकडून निर्माण केलेली अशी एक संरचना आहे की त्यास राहण्यासाठी, दैनंदिन कार्य करण्यासाठी मानवी वस्तीचा उपयोग होतो. कृषी व्यवसायासाठी लागणारे मनुष्यबळ, श्रमविभागणी, सामाजिक शांतता व स्थैर्याची गरज, सामाजिक प्रतिष्ठा, विविध जबाबदाऱ्यांची जाणीव व त्यांच्या पूर्ततेसाठी लागणारी इतरांची मदत इत्यादी घटकांचा विचार केल्यास मानवास जीवन जगत असताना समाजाचा घटक म्हणून विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. या जबाबदाऱ्या पार पाडत असताना समाजाच्या चौकटीत राहूनच कामे करावी लागतात. या कामाचे किंवा कार्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वस्त्या होय.

ग्रामीण वस्तीतील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, कार्यात्मक व भूमी उपयोजनाच्या दृष्टिकोनातून खूप मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. या बदलास कारणीभूत असलेल्या भौगोलिक व सामाजिक घटकांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

1.2 अभ्यास क्षेत्र :

प्रस्तुत संशोधनासाठी लातूर जिल्ह्यातील एकूण 10 तालुके आहेत. त्यापैकी रेणापूर व जळकोट या दोन तालुक्यांची निवड करण्यात आलेली आहे.

रेणापूर - रेणापूर तालुका बालाघाट पठारावर वसलेला आहे. समुद्रसपाटीपासूनची उंची 450 ते 730 मीटर च्या दरम्यान आहे. रेणापूर तालुक्याचे क्षेत्रफळ 552 चौ.कि.मी. आहे. रेणापूर तालुक्याचा अक्षांश व रेखांशाचा विचार केला तर $18^{0}11"$ उत्तर $76^{0}11"$ पूर्व असे आहे. रेणापूर तालुक्याच्या दक्षिणेस लातूर जिल्ह्याची सीमा लागते. उत्तर पश्चिमेस बीड जिल्ह्याची सीमा लागते. पुर्वेस चाकूर तालुक्याची सीमा लागते. सन 2011 च्या जनगणनेनुसार रेणापूर तहसीलमधील लोकसंख्या 142187 एवढी असून यात 74023 पुरुष तर 68164 महिलांचा समावेश होतो. महिलांचे पुरुषाशी गुणोत्तर प्रमाण दर हजार पुरुषामागे 922 स्त्रिया एवढे आहे. साक्षरता दराचा विचार केला तर 76.27 टक्के एवढा आहे. लोकसंख्येचा दसवार्षिक वृद्धीदर 16.42 टक्के आहे.

जळकोट - जळकोट तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार $18^{0}29'27"$ उत्तर अक्षवृत्त ते $18^{0}43'8"$ उत्तर अक्षवृत्त आहे. रेखावृत्तीय विस्तार $77^{0}1'51"$ पूर्व रेखावृत्त ते $77^{0}16'23"$ पूर्व रेखावृत्त आहे. लातूर जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी जळकोट तालुक्याचे क्षेत्रफळ 4.84 टक्के म्हणजे 346 चौ.कि.मी. एवढे आहे. जळकोट तालुक्याच्या दक्षिणेस दिशेस उदगीर तालुक्याची सीमा लागते व उत्तर पूर्वेस नांदेड जिल्ह्याची सीमा लागते. तर जळकोट तालुक्याच्या पश्चिम दिशेस अहमदपूर तालुक्याची सीमा लागून आहे. सन 2011 च्या जनगणनेप्रमाणे जळकोट तालुक्याची एकूण लोकसंख्या 87201 एवढी आहे. यात 45,058 एवढया महिला तर पुरुष 42,143 एवढे होते.

1.3 उद्दिष्ट्ये :

1) रेणापूर व जळकोट तालुक्यातील प्राकृतिक रचना आणि सामाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

2) रेणापूर व जळकोट तालुक्यातील ग्रामीण वस्तीच्या वितरणाचा अभ्यास करणे.

3) रेणापूर व जळकोट तालुक्यातील ग्रामीण वस्तीच्या वाढीचा अभ्यास करणे.

4) रेणापूर व जळकोट तालुक्यातील ग्रामीण वस्तीचे प्रकार आणि प्रारूपाचा अभ्यास करणे.

5) रेणापूर व जळकोट तालुक्यातील ग्रामीण वस्तीचा आकार अंतर यांचा स्पष्टीकरणात्मक अभ्यास करणे.

6) रेणापूर व जळकोट तालुक्यातील ग्रामीण वस्तीतील लोकसंख्या वाढीचा अभ्यास करणे.

7) रेणापूर व जळकोट तालुक्यातील ग्रामीण वस्तीची अंतर्गत रचना आणि बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या सामग्रीचा अभ्यास करणे.

8) रेणापूर व जळकोट तालुक्यातील ग्रामीण सेवा केंद्राचा व सेवासुविधांच्या क्षमतेचा अभ्यास करणे.

1.4 गृहितके :

1) ग्रामीण वस्तीची उत्पत्ती अनुकूल नैसर्गिक साधनसंपत्ती आणि सांस्कृतिक घटकांची उपलब्धता असलेल्या ठिकाणी होत असते.

2) रेणापूर आणि जळकोट तालुक्यातील ग्रामीण वस्तीचा आकार आणि अंतर सर्व ठिकाणी सारखे नाही.

3) ग्रामीण वस्तीची वाढ सर्वच ठिकाणी सारख्या प्रमाणात होत नाही.

4) अभ्यासक्षेत्रात ग्रामीण वस्त्यांचे प्रकार आणि प्रारूपे सर्व ठिकाणी सारख्या प्रमाणात आढळून येत नाहीत.

1.5 साहित्याचे पुनरावलोकन

ग्रामीण वस्तीचा संशोधनात्मक अभ्यास अनेक वर्षांपासून वैश्विक, देश, राज्य व स्थानिक पातळीवर करण्यात येत आहे. याची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे आहे.

1) गोपाल कृष्ण आणि चंदना (1977) यांनी रेशन दुकान, शाळा, पोस्ट कार्यालय, डिस्पेंसरी आणि पशुवैद्यकीय सेवा यांच्या आधारे ग्रामीण सेवा केंद्राचा अभ्यास केला आहे.

2) डॉ.के.बी. कनकुरे (1986) यांनी 'मराठवाड्यातील ग्रामीण आणि नागरी वस्तीचा संशोधनात्मक अभ्यास' केला आहे. या संशोधन अभ्यासामध्ये मराठवाड्यातील वस्तीच्या उत्क्रांतीपासून ते 1986 पर्यंत वस्तीमध्ये झालेल्या परिवर्तनाचे विश्लेषण केले आहे. त्याचबरोबर मराठवाड्यातील वस्तीच्या प्रादेशिक असमतोल विकासाचे विश्लेषण केले आहे.

3) नागरगोजे ए.यु. यांनी 1981 ते 2011 या कालखंडातील उदगीर तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास केला आहे.

4) ए.पी. कुंभार (1988) यांनी 'Studied Rural Habitat as Regional Study of Rural Settlement in Nira Valley' या प्रबंधात निरनिराळ्या ग्रामीण वस्तीचा सदृश्य प्रदेशाचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या प्रबंधात नीरा नदीखोऱ्यातील ग्रामीण वस्तीवर तेथील भौगोलिक घटकांचा कशा प्रकारे परिणाम झाला आहे याचा अभ्यास केला आहे.

5) ए.ए. काळगापुरे (2009) यांनी 'Geographical Analysis of Population and Settlements in Latur District' या पीएच.डी. शोधप्रबंधात लातूर जिल्ह्यातील लोकसंख्या व वस्ती यांचा भौगोलिक विश्लेषणात्मक अभ्यासात लोकसंख्येची रचना, लोकसंख्या व वस्तीमधील सहसंबंध, वस्तीची प्रारूपे, प्रकार, वाढ, आकार, अंतर इत्यादी घटकांच्या माध्यमातून अभ्यास केलेला आहे.

6) सय्यद मौलाना महेताब (2016) यांनी 'बिदर जिल्ह्यातील वसाहतीचे भौगोलिक विश्लेषण' या पीएच.डी. शोधप्रबंधात बिदर जिल्ह्यातील ग्रामीण वसाहतीचे वितरण, वाढ, ग्रामीण वसाहतीचे प्रकार, प्रारूपे व ग्रामीण सेवा केंद्राचा अभ्यास केलेला आहे.

7) चित्ते अंगद किशनराव (2016) 'लातूर व औसा तालुक्यातील ग्रामीण वसाहतींचा अभ्यास' या पीएच.डी. शोधप्रबंधात लातूर व औसा तालुक्यातील वसाहतीची उत्क्रांती, ग्रामीण वसाहतीचे वितरण व स्थान, ग्रामीण वसाहतींची वाढ, आकार आणि अंतर, ग्रामीण वसाहतीचे प्रकार आणि प्रारूप, ग्रामीण सेवा केंद्र यांचा अभ्यास केलेला आहे.

1.6 अभ्यास पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम आकडेवारी वापरण्यात येणार असून यासाठी जिल्हा जनगणना अहवाल पुस्तिका, जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, विविध संदर्भ ग्रंथ, शोधप्रबंध, विविध संशोधन पत्रिका, लातूर जिल्हा गॅझेटिअर, विविध संदर्भ ग्रंथ, भारतीय स्थलदर्शक नकाशे, गुगल अर्थ वेबसाईट इत्यादींचा आधार घेण्यात येणार आहे.

वस्त्यांमधील सरासरी अंतर काढण्यासाठी वलेंटी विनीड यांच्या $D = \sqrt{\frac{A}{N}}$ सूत्राचा वापर करण्यात येणार आहे.

$$D = \sqrt{\frac{A}{N}}$$

D = वस्त्यांच्या दरम्यानचे सरासरी अंतर

A = तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ

N = वस्त्यांची एकूण संख्या

1.7 प्रकरण मांडणी :

प्रस्तुत शोधप्रबंधाची मांडणी एकूण आठ प्रकरणात येणार असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे

1) प्रकरण पहिले :- संकल्पनात्मक मांडणी

2) प्रकरण दुसरे :- रेणापूर व जळकोट तहसीलची प्राकृतिक व सांस्कृतिक रचना

3) प्रकरण तिसरे :- ग्रामीण वस्तीची उत्क्रांती

4) प्रकरण चौथे :- ग्रामीण वस्तीचे वितरण वाढ आणि स्थान

5) प्रकरण पाचवे :- ग्रामीण वस्त्यांचे प्रकार आणि प्रारूपे

6) प्रकरण सहावे :- ग्रामीण वस्तीची अंतर्गत रचना

7) प्रकरण सातवे :- ग्रामीण सेवा केंद्र

8) प्रकरण आठवे : निष्कर्ष व शिफारशी

1.8 संदर्भ ग्रंथ

1) Gopal Krishnan and Chandna M.M. (1977): 'The System of Service Centres in the Outer Himalayas', Published in Man, Culture and Settlement (Edited by) Robert C., Singh K.N. and Rana P.B., New Delhi

2) Kankure K.B., (1986) : 'Marathwada : A Study in Settlement Geography', Unpublished Ph.D. Thesis Marathwada University, Aurangabad

3) नागरगोजे ए.यु. (2013) : 'उदगीर तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचा भौगोलिक अभ्यास', अप्रकाशित शोधप्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

4) Kumbharkar A.P. (1988), 'A Study of Rural Habitat in Nira Valley', Unpublished Ph.D. Thesis, Shivaji University, Kolhapur

5) Kalgapure A.A. (2009) : 'Geographical Analysis of Population and Settlements in Latur District', Unpublished Ph.D. Thesis, Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

6) सय्यद मौलाना महेताब (2016) : 'बिदर जिल्ह्यातील वसाहतीचे भौगोलिक विश्लेषण', अप्रकाशित शोधप्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

7) चित्ते अंगद किशनराव (2016) : 'लातूर व औसा तालुक्यातील ग्रामीण वसाहतींचा अभ्यास', अप्रकाशित शोधप्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

1) डॉ.एस.डी. मौर्य (2011), अधिवास भूगोल, शारदा पुस्तक भवन, इलाहाबाद
2) रामयज्ञ सिंह (2005), अधिवास भूगोल, रावत पब्लिकेशन्स, जयपुर और नई दिल्ली
3) डॉ.सुरेशचंद्र बंसल (2009-10), ग्रामीण वस्ती भूगोल, मीनाक्षी प्रकाशन, मेरठ
5) सामाजिक व आर्थिक समालोचन 2021-22
6) भारतीय भूस्थलदर्शक नकाशा 1:50000
7) अहीरराव, वा. र. (1997): अधिवास भूविज्ञान, निराली प्रकाशन पुणे.
8) गुर्जर रामकुमार आणि जाट बी. सी. (2006), मानव भूगोल, पंचशील प्रकाशन, जयपूर.
9) घारपूरे, व्हि. टी. (2001): वस्ती भूगोल, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
10) तिवारी आर. सी. (2001): अधिवास भूगोल, प्रयाग पुस्तक भवन इलाहाबाद.
11) भारतीय जनगणना अहवाल 1991, 2001 आणि 2011.
12) भागवत, अ. वि. (1988): अधिवास भूगोल, नरेंद्र प्रकाशन पूणे.
13) भारतीय स्थलदर्शक नकाशा.
14) Dr.Mandal R.B. (1979) Introduction to Rural Settlement Concept Publishing Company, New Delhi.
15) www.latur.ac.in
16) https://mahades.maharashtra.gov.in
17) www.mahades.nic.in

संशोधक

रामेश्वर राजकुमार स्वामी

एम.ए., बी.एड. सेट

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बळवंत तेजेराव पाटील

भूगोल विभागप्रमुख

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,

मुखेड ता.मुखेड जि.नांदेड